# प्रेस नोट

दिनांक :- २७/ ०४/२०२६

**" अंगडिया यांचेकडुन रक्कम घेवुन प्रवास करणाऱ्या इसमांवर पाळत ठेवुन त्यांचे वाहनातील रोख रक्कमेची चोरी करणाऱ्या आरोपीस अटक करून मालमत्ता हस्तगत करून गुन्हा उघडकीस आणलेबाबत "**

दिनांक ०७/०४/२०२६ रोजी यातिल फिर्यादी श्री. निखिल अरविंद शाह वय ४४ वर्ष हे मालाड पुर्व येथील डायमंड मार्केटमधिल अंगडिया कडुन रोख रक्कम १०,००,०००/- घेवुन सदरची रक्कम त्यांच्या ॲक्टिव्हा मो/स्कुटरच्या डिकीमध्ये ठेवुन प्रवास करत होते. फिर्यादी यांनी त्यांची ॲक्टिव्हा मो/स्कुटर त्यांच्या बिल्डिंगच्या पार्किंगमध्ये पार्क करून ते रक्कम ठेवण्याकरीता पिशवी आणण्याकरीता गेले असता त्यांच्या पाळतीवर असलेल्या ॲक्टिव्हा मो/स्कुटरवरील ०२ इसमांनी त्यांच्या ॲक्टिव्हा मो/स्कुटरचे डिक्कीमधुन रोख रक्कम १०,००,०००/- चोरी करून पळुन गेले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून कांदिवली पोलीस ठाणेस गु.नों.क्र. ४२२/२०२६ कलम ३०३(२) भा.न्या.संहिता प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचा तपास मा.वरिष्ठांच्या मार्गदर्शना खाली पोलीस उप निरीक्षक नितिन साटम व गुन्हे प्रकटिकरण पथकाने सुरू करून कांदिवली ते पुर्व द्रुतगती महामार्गा पर्यंतचे शासकिय तसेच खाजगी सी.सी.टि.व्हि.चे असे एकुण १२५ फुटेजची तपासणी करण्यात आली. सदर गुन्हयाची कार्यपध्दती वरून आरोपीतांबाबत गोपनीय माहिती काढुन नमुद पथकाने मा. वरिष्ठांचे परवानगीने राज्य गुजरात येथे जावुन स्थानिक पोलीसांचे मदतीने यातिल आरोपीतास ताब्यात घेवुन तपास केला असता त्याने सदरचा गुन्हा त्याने अन्य दोन आरोपीताच्या मदतीने केला असल्याचे कबुल केले.अटक आरोपीताकडे कौशल्यपुर्वक तपास करून त्याच्या कडुन गुन्हयात चोरीस गेलेल्या १०,००,०००/- रू.चे मालमत्तेपैकी रोख रक्कम ७,००,०००/- हस्तगत करण्यात आली आहे. उर्वरित आरोपीतांना अटक करून उर्वरित रक्कम हस्तगत करण्यात येत आहे.

सदर यशस्वी कामगिरी मा. पोलीस सह आयुक्त ( का व सु), मा. अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग श्री. शशीकुमार मीना, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ११ श्री. संदीप जाधव, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, मालवणी विभाग नीता पाडवी यांचे मार्गदर्शनाखाली श्री.करन सोनकवडे,,वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कांदिवली पोलीस ठाणे , श्री. शेखर शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे प्रत्यक्ष देखरेखीखाली पोलीस उप निरीक्षक नितिन साटम, गुन्हे प्रकटीकरण पथक पो.ह जोपळे, पो. ह गौतम, पो.शि. जोगलपुरे, पो.शि. वाघमारे, पो.शि. नादकर,पो.शि. आदित्य राणे, परि. ११ कार्यालय, मुंबई यांनी पार पाडली आहे.

----//----